दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**वृत्तविशेष क्र.359** **दिनांक : 29 मार्च, 2019**

## दिव्यांगांनी अनुभवली व्हीव्हीपॅट मशीनची कार्यप्रणाली

**ठाणे (29):** लोकसभा सार्वत्रिक निवडणुक 2019 करिता मतदानाच्या दिवशी वापरण्यात येणाऱ्या व्हीव्हीपॅट (व्होटर व्हेरिफेबेल पेपर ऑडिट ट्रेल) मशीनचे प्रात्यक्षिक विधानसभा मतदार संघ १४६ व विधानसभा मतदारसंघ १४८ मधील दिव्यांग व्यक्तींना आज दाखविण्यात आले. स्वीप(सिस्टॅमॅटिक व्होटर एज्युकेशन अँड इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्राम) या अंतर्गत हे प्रात्याक्षिक सादर करण्यात आले.

स्वीप (सिस्टॅमॅटिक व्होटर एज्युकेशन ऑण्ड इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्राम) या अंतर्गत शहरातील प्रमुख महाविद्यालये, प्रमुख प्रशिक्षण प्रबोधिनी, प्रमुख औद्योगिक संस्था, प्रमुख राजकीय पक्ष आणि प्रसिध्दी माध्यमे यांना मतदार नोंदणी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ईव्हीएम, व्हीव्हीपॅट संबंधी माहिती देण्याचे काम सुरू आहे. या अंतर्गतच आज विधानसभा मतदार संघ १४६ व विधानसभा मतदारसंघ १४८ मधील दिव्यांग व्यक्तींना व्हीव्हीपॅट(व्होटर व्हेरिफेबेल पेपर ऑडिट ट्रेल) मशीनचे प्रात्याक्षिक दाखवण्यात आले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2019 मध्ये देशातल्या सर्व मतदान केंद्रावर व्हीव्हीपॅट यंत्र बसविण्यात येणार आहे. ईव्हीएम मशीनवर असलेल्या उमेदवारांच्या नावासमोरील बटण दाबल्यानंतर उमेदवाराचे नाव, क्रमांक, चिन्ह यांचा उल्लेख असलेली व्हीव्हीपॅट स्लीप 7 सेकंद मतदाराला दिसणार आहे, त्यानंतर आपोआप ही स्लीप कट होवून बीप वाजल्यानंतर स्लीप सीलबंद पेटीत जमा होणार आहे. ही व्हीव्हीपॅट मशीन उघडण्याचा अधिकार हा फक्त निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आलेला आहे. या व्हीव्हीपॅट मशीनमुळे मतदारांना आपण दिलेल्या मताची खातरजमा करण्याची संधी मिळणार आहे.